नगरसचिव

पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र.३**

**जून २०२०**

**पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि.१७/६/२०२० रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**वृत्तांत कायम करणे.**

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**– स्थायी समितीचे ठराव –**

**विषय क्र.९**

संदर्भ – १) मा. अविनाश बागवे, मा. श्रीमती लता राजगुरु, मा. सौ. सुनिता गलांडे, मा. ॲड. अविनाश साळवे व मा.सौ. राजश्री काळे दि.१८/३/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११९,दि.१२/५/२०२०

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

सन २०१९ – २०२० या आर्थिक वर्षात माहे मे मध्ये लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता तसेच माहे सप्टेंबर मध्ये विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू होती. यामुळे जवळजवळ २ महिने पुणे महापालिकेची कामे ठप्प होती. माहे डिसेंबर २०१९ व माहे जानेवारी २०२० या दरम्यान स्वच्छ सर्व्हेक्षण असल्याने स्थापत्य विषयक अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचेवर स्वच्छ सर्व्हेक्षणाची जबाबदारी होती. यामुळे सन २०१९ – २०२० या आर्थिक वर्षातील काही विकासकामे प्रलंबित राहिलेली आहेत.

सद्यस्थितीत करोना सारख्या संसर्गजन्य रोगामुळे मागील एक महिन्यापासून विविध खबरदारी म्हणून विविध कामांस निर्बंध लावलेले आहेत, तसेच महापालिकेच्या आवारात नागरिकांना व इतरांना येण्यास मज्जाव केलेला आहे राज्य शासन व जिल्हाधिकारी यांचेकडून अनेक प्रकारचे आदेश निर्गमित झाले आहेत. करोना पासून बचाव करणेसाठी शहरातून मोठ्या प्रमाणावर कामगार वर्ग मूळगावी गेलेला आहे. तसेच सद्यस्थितीत करोना रुग्णांचा प्रसार पाहता पुढील किती काळापर्यंत निर्बंध असतील हे निश्चित नाही. पुणे महापालिकेची चालू असलेली अनेक कामे ठप्प झाली असून त्याचा परिणाम पुणे शहराच्या विकासावर झालेला आहे. शहरातील मोठी दुकाने, बाजारपेठ व मार्केट देखील बंद आहेत.

एकंदरीत सन २०१९ – २०२० या आर्थिक वर्षात निवडणूक आचारसंहिता, स्वच्छ सर्व्हेक्षणची कामे व करोना सारखा संसर्गजन्य आजार या सर्व बाबींमुळे सन २०१९ – २०२० या आर्थिक वर्षात ३ महिने कामकाज सुरळित व वेळेत न झाल्यामुळे या आर्थिक वर्षातील विकासकामांना, ज्या कामांचा निविदा प्रक्रिया किंवा वर्क ऑर्डर ३१ मार्च २०२० पूर्वी झालेल्या आहेत अशा विकासकामांना दि. ३१ मे २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१०**

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/६१ दि. १३/५/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१३७,दि.१९/५/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा सणस ग्राऊंड बॉईज हॉस्टेल येथे लागण झालेल्या रुग्णांना व संशयित रुग्णांना नाष्टा व दोनवेळचे जेवण पुरविणे या कामाचे मे.द अक्षय पात्रा फाउंडेशन यांना देयक र.रु. ४,६६,४७५/– अदा करणेस व त्यानुसार करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

**विषय क्र.११**

संदर्भ – १)मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांचे आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/९५२५ दि.१४/३/२०२०

२)शासन निर्णय महसूल व वन विभाग सीएलएस–२०२०/प्र.क्र.१२३/म–३,दि.१६/३/२०२०
३)शासन परिपत्रक वित्त विभाग संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५९/२०/कोषा.प्रशा–५,दि.१८/३/२०२०
४)जिल्हाधिकारी कार्यालय गृह शाखा विभागाकडील पत्र जा.क्र. पगरा/कावि/४५२/२०२० दि.१६/४/२०२०
५) मा.महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांची मान्यता ठराव क्र. ६/४५ दि.२३/४/२०२०
६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/६५ दि. १८/५/२०२० चे पत्र.
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४१,दि.१९/५/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत खराडी स.नं. ४, रक्षक नगर येथे तयार करण्यात आलेल्या विलगीकरण कक्षासाठी अतितातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये निवासी साहित्य खरेदी व स्थापत्यविषयक केलेल्या खालीलप्रमाणे कामांची पश्चात माहिती मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

१) कोरोना प्रतिबंधात्मक योजनेअंतर्गत स.नं. ४, रक्षक नगर, खराडी क्रीडा संकुल येथील विलगीकरण कक्षासाठी (दोन इमारती) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील निवेदनात नमूद माल ठेकेदार मे.सलीम construction व मे.साईराम construction यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये खरेदी केलेल्या तसेच त्यांचेकडून स्थापत्यविषयक केलेल्या कामांसाठी त्यांचेशी करारनामा न करता व सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम भरुन न घेता ठेकेदार मे.सलीम construction यांचे र.रु. १०,०१,००९/- व ठेकेदार मे.साईराम construction यांचे र.रु. ३,००,४७१=९२ चे झालेल्या खर्चास,

२) कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली आरोग्य विषयक आणीबाणीची परिस्थिती आटोक्यात येईपर्यंत, आवश्यकतेनुसार मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील निवेदनात नमुद माल पुरविणेचे काम त्याच दरानुसार वरील ठिकाणी अथवा त्याच परिसिरात इतरत्र ठेकेदार मे.सलीम construction व मे.साईराम construction यांचेकडून काम करुन घेणेस,

<u>विषय क्र.१२</u>

संदर्भ – १) दि.१५/५/२०२० रोजी झालेल्या अंशदायी वैद्यकीय सहाय योजना समिती बैठकीचे इतिवृत्त
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/६८ दि. १८/५/२०२० चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४४,दि.१९/५/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

अंशदायी वैद्यकीय सहाय योजनेचे सभासद असलेल्या पुणे म.न.पा. आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांना कोविड बाधा झाल्यास वैद्यकीय उपचाराच्या खर्चाकरीता १००% प्रतिपूर्ती देणे व कोविड पॅनडॅमिक काळामध्ये अंशदायी वैद्यकीय सहाय योजनेची वर्गणी कपात न करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

<u>विषय क्र.१३</u>

माहे एप्रिल २०२० ते ऑगस्ट २०२० अखेर रजा मिळणेबाबत मा.महेश लडकत, सभासद पुणे महानगरपालिका यांचे दि.२०/५/२०२० चे पत्र.

<u>विषय क्र.१४</u>

माहे मे २०२० ते जुलै २०२० अखेर रजा मिळणेबाबत मा.सौ.मुक्ता टिळक,आमदार तथा सभासद पुणे महानगरपालिका यांचे दि.२०/५/२०२० चे पत्र.

<u>विषय क्र.१५</u>

माहे एप्रिल २०२० ते जून २०२० अखेर रजा मिळणेबाबत मा.मारुती (नाना) सांगडे, सभासद पुणे महानगरपालिका यांचे दि.२१/५/२०२० चे पत्र.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :– ५/६/२०२०

**सुनील पारखी**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**